

# मातृमंदिर देवरुख
# वार्षिक अहवाल २०२३-२४




## जिल्ह्यातील पहिले
## मातृमंदिर पशुधन व्यवस्थापन
## व दुग्धोत्पादन पदविका विद्यालय

# मातृमंदिर देवरुख

Reg. No. RE68

देवरुख, ता.संगमेश्वर, जि. रत्नागिरी ४१५८०४ (महाराष्ट्र)

**संस्थापिका - श्रीमती इंदिराबाई हळबे**

इ-मेल : matrumandir_54@rediffmail.com
वेबसाइट : www.matrumandir.org

## * कार्यकारी मंडळ *



सौ.मेघना चाळके
अध्यक्ष



श्री.अभिजित हेगशेट्ये
कार्याध्यक्ष



श्री.विनय पानवळकर
कार्यवाह



श्री.सुहास बने
कार्यवाह



सौ.पल्लवी कोरगावकर
उपाध्यक्ष



श्री.विलास कोळपे
उपाध्यक्ष



श्री.उदय लोध
उपाध्यक्ष



श्री.सुनिल कोळवणकर
कार्योपाध्यक्ष



श्री.अनिल अणेराव
कोषाध्यक्ष



श्री.संतोष शेट्ये
सदस्य



श्री.आत्माराम मेस्त्री
सदस्य



श्री.संदेश (बापू) शेट्ये
सदस्य



श्री.विजय नारकर
सदस्य

## * विश्वस्त मंडळ *



सौ.सुचेता कोरगावकर



श्री.बबन डिसोझा



श्री.जॉर्ज पटेल



श्री.हुसेन दलवाई

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

मातृमंदिर संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १0.00 वाजता खालील कामांचा विचार करण्यासाठी भरेल. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा वरील वेळानंतर अर्धा तासानंतर सुरु होईल. अशा सभेला गणसंख्येची अट असणार नाही. आपण या सभेला अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

**✻ आपले ✻**

| | | |
|---|---|---|
| विनय पानवळकर<br>सुहास बने<br>कार्यवाह | अभिजित हेगशेट्ये<br>कार्याध्यक्ष | सौ.मेघना चाळके<br>अध्यक्ष |

सभेपुढील विषय :

१)मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२)सन २०२३-२४ या वर्षाचे ऑडिटेड हिशेब व अहवालाला मंजूरी देणे.

३)सन २०२४-२५ या वर्षासाठी हिशेब तपासनीस नेमणूक करणे.

४)संस्थेच्या विविध विभागांची व कार्यक्रमाची माहिती देणे.

५)अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणा-या विषयांचा विचार करणे.

# मनोगत

साथीयों झिंदाबाद.

मातृमंदिर संस्थेचा २०२३–२४ चा वार्षिक अहवाल सादर करताना नव्या प्रकल्पांना मिळणारी चालना आनंददायी आहे. मात्र त्यावेळी संकल्पनेतील पूर्ण आकार घेऊ न शकलेल्या प्रकल्पांबद्दल मनात किंतू आहे. सामाजिक कार्यातील वैचारीक बांधिलकीशी जोडलेल्या संस्थांना अवकाश विस्तारताना अधिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मातृमंदिरचा हा एका अवघड वळणाचा नवे अवकाश कवटाळू पाहणारा प्रवास अधिक खडतर आहे. नवनव्या संकल्पाना आकारत आहेत. मातृमंदिरच्या संस्थापिका इंदिराबाई उर्फ मावशी हळबे यांचे अभूतपूर्व योगदान आणि अनमोल वारसा हिच संस्थेची खरी शक्तीस्थळे आहेत. या नैतिक बळावर संस्था आपल्या ध्येयाकडे वाटचाल करीत आहे. या प्रवासातील संस्थेच्या संचालकांची भक्कम साथ आणि हितचिंतकांचे अभूतपूर्व पाठबळ हे ख–्या अर्थाने संस्थेच्या नवोन्मेषाचे बळ आहे.

संस्थेच्या विविध उपक्रमात ह्या वर्षी विशेष उलेल्ख करणारी बाब ही संस्थेने सुरु केलेले पशुधन व्यवस्थापन आणि दुग्ध उत्पादन पद्विका अभ्यासक्रम ( म्हापसू नागपूर विद्यापीठ) रत्नागिरी जिल्ह्यातील सुरु झालेला हा पहिला पदविका अभ्यासक्रम मातृमंदिर ओझरे फार्म येथे सुरु झाला याला पहिल्यावर्षी अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. या माध्यमातून पशुधन क्षेत्रात या जिल्ह्यातील तरुण अधिकाधिक प्रशिक्षित होतील आणि जिल्ह्यातील दुग्धव्यवसाय वाढविण्यासाठी त्याचा फार मोठा परिणाम होऊ शकेल. प्रा. मधु दंडवते कृषि विद्यालय कृषी अभ्यासक्रम उत्तम सुरु आहे.

आयटीआय टर्नर, फिटर, वायरमन, मॅकॅनिकल, वेल्डर, सुईंग टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम सुरु आहेत. या पदविका प्राप्त मुलांना ॲडलर, वनाझ, नेल्सन, टाटा या ठिकाणीरोजगार आणि विशेष प्रशिक्षणाची मिळणारी संधी हे विशेष नोंद करणारे आहे. येत्या वर्षात यात मोटरमेकॅनीक, इलेक्ट्रीशन, फॅशन डिझायनींग आदी अभ्यासक्रम सुरु करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. प्रसाद बालक मंदिर ही मावशींनी सुरु केलेली मराठी माध्यमाची बालवाडी आणि त्यातील वाढती मराठी माध्यमातील मुलांची संख्या हा जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमातील शाळांसाठी विशेष कुतुहलाचा विषय आहे.

गोकुळ हा मावशींच्या सामाजिक कार्यातील अत्यंत हळवा कोपरा, मातृमंदिर संस्थेच्या कार्यातील सर्वाधिक महत्वाचा भाग आहे. गेल्या वर्षभरात येथील मुलांना अद्ययावत सुविधा आणि शिक्षण मिळावे यासाठी संस्थेने विविध संकल्पना अंमलात आणल्या आहेत. आज येथे २६ मुली आहेत. त्यातील १० वी १२ वी टप्प्यावर अनेक मुली आहेत. त्यांचे पुढील शिक्षण नियोजन आहे. गोकुळ व्यवस्थापनासाठी मोठा खर्च होतो. मातृमंदिरचे हितचिंतक देणगीदार यांच्या मदतीतून त्याची उभारणी होते. आज जिल्ह्यातील सर्वोत्तम बालगृह म्हणून याचा सन्मान होत आहे. मुलींच्या आरोग्य, रक्षण, शिक्षण आणि उच्च कौशल्य आधारीत शिक्षण देत त्यांना जीवनात स्वावलंबी करणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. यासाठी अनेक संकल्पना आणि बाबी पूर्ण करणे बाकी आहे. यासाठी मोठा निधी भविष्यात उभारणे हे मातृमंदिर समोरील मुख्य उदाहरण आहे. मातृमंदिर हॉस्पीटलसाठी उत्तम इमारत आज सर्वकार्येशु सर्वदा या माध्यमातून आलेल्या निधीतून उभी राहिली आहे. मात्र येथे अद्ययावत रुग्णालय सुरु करण्याच्या प्रयत्नाना अपेक्षित यश आलेले नाही.

मावशी हळबे यांच्या जीवन चरित्राची देवरुखच्या सावित्रीबाई तिसरी आवृत्ती मनोविकास प्रकाशनने अत्यंत आकर्षक स्वरुपात प्रकाशित केली त्याबद्दल मनोविकास प्रकाशन आणि संपादक अरविंद पाटकर यांचे विशेष आभार, तसेच या पुस्तकाचे अभिवाचन मोहना जोगळेकर (अमेरीका) यांनी यू ट्यूबवर केले आणि अमेरीकेतून त्याला विशेष प्रसिध्दी दिली त्याबद्दल मोहना जोगळेकर यांचे विशेष आभार !

संस्थेच्या सामाजिक कार्यातील प्रसंसनीय कार्याची दखल घेत लोटे पर्शुराम उद्योग संघटनेचा प्रतिष्ठेचा मानला जाणारा कोकण गौरव पुरस्कार आणि हुतात्मा अपंग बहुउद्देशीय संस्था कराड यांचा गौरव पुरस्काराने संस्थेला सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या प्रगतीशील वाटचालीत संस्थेच्या अध्यक्ष मा. मेघना चाळके आणि सर्व संचालक मंडळ तसेच संस्था विश्वस्त मा.सुचेताताई कोरगांवकर आणि विस्वस्त मंडळ यांचे सहकार्य आणि योगदान अभुतपूर्व आहे. सोबत सर्व सभासद हितचिंतक, देणगीदार यांचे सहकार्य आहे. आपण या कार्यात सहभागी होत मावशींचा विचार आणि कार्य पुढे नेऊ अशी अपेक्षा आहे.

अभिजित हेगशेट्ये
कार्याध्यक्ष

# श्रीमती इंदिरा म. बेहरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था साडवली.

ऑगस्ट २०२३ या शैक्षणिक वर्षात ६९ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले. संस्थेत एकूण पटावरील विद्यार्थी १२६ आहेत. आज पर्यंत आपल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून २०६२ विद्यार्थ्यानी विविध व्यवसायात प्रशिक्षण घेतले. सुमारे ९०% विद्यार्थी नोकरी आणि स्वयंरोजगार करीत आहेत.

दिनांक ०३/०७/२०२३ ते दिनांक ०७/०७/२०२३ रोजी पर्यत अखिल भारतीय व्यवसाय वार्षिक परीक्षा जुलै – २०२३ औदयोगिक प्रशिक्षण संस्थेत प्रात्यक्षिक परीक्षा यशस्वीरित्या पार पडल्या.सदर परीक्षेला १३८ प्रशिक्षणार्थी बसलेले होते.सदर परीक्षेसाठी श्री.एस पी बीर्जे, गट निदेशक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था रत्नागिरी यांची परीक्षा केंद्राध्यक्ष म्हणून शासनाकडून नियुक्ती करण्यात आली होती. आपल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे कामकाज पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

अखिल भारतीय व्यवसाय वार्षिक परीक्षा जुलै २०२३ चा निकाल ८९.१३% लागला.

## शैक्षणिक सत्र ऑगस्ट २०२३ मधील प्रवेशित विद्यार्थाची सांख्यिकी माहिती

| अ.क्र | व्यवसाय | प्रवेशित प्रशिक्षणार्थी - ऑगस्ट 2023 |
|---|---|---|
| 01 | कातारी / टर्नर | 07 |
| 02 | जोडारी / फिटर | 05 |
| 03 | तारतंत्री / वायरमन | 20 |
| 04 | मेकॅनिक (मोटार व्हेईकल) | 21 |
| 05 | वेल्डर | 08 |
| 06 | सुईंग टेक्नॉलॉजी | 08 |
| | एकूण | 69 |

## प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची सांख्यिकी माहिती.

| Trade | No of Units | Period | Intake Capacity | Statistical Information Up to July 2023 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ITI | | BTE | Trysem | Total | Trainee On Roll Aug. 2023 | | |
| | | | | Boys | Girls | | | | Boys | Girls | Total |
| Turner | 2 | 2 Yrs. | 40 | 307 | 02 | 61 | 39 | 409 | 13 | -- | 13 |
| Fitter | 2 | 2 Yer. | 40 | 475 | 08 | -- | 08 | 491 | 14 | -- | 14 |
| Wireman | 2 | 2 Yer. | 40 | 301 | 04 | 57 | 148 | 510 | 38 | 01 | 39 |
| Welder | 1 | 1 Yr. | 20 | 227 | 02 | 42 | 19 | 290 | 08 | -- | 08 |
| Mechanic (Motor Vehicle) | 2 | 2 Yer. | 48 | 288 | 01 | -- | -- | 289 | 44 | -- | 44 |
| Sewing Technology | 1 | 1 Yr. | 20 | 04 | 69 | -- | -- | 73 | -- | 08 | 08 |
| Total | 10 | | 208 | 1602 | 86 | 160 | 214 | 2062 | 117 | 09 | 126 |

## कॅम्पस इंटरव्ह्यू –

दिनांक ०८ जुलै २०२३ रोजी ॲडलर हेल्थ केअर प्रा.ली साडवली यां कंपनी मार्फत श्री.सचिन गदे साहेब व श्री. अविनाश वैद्य साहेब यांनी टर्नर व फिटर या दोन व्यवसायांतील प्रशिक्षणार्थ्यांची मुलाखत घेवून त्यातील आपल्या आय.टी.आय मधील ०९ प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली.

तसेच नेल्सन इंडिया कंपनी पुणे या कंपनी मध्ये आपल्या आय.टी.आय मधील ०४ वेल्डर प्रशिक्षणार्थीची निवड झाली.





## दीपकाडी महोत्सव २०२३

शनिवार दिनांक ०५ ऑगस्ट २०२३ रोजी सडयावरील जैवविविधतेचे १० दिवसाचे महोस्तव करण्यात आले. महोत्सवासाठी श्री. सुधीर रिसबुड (सडेसंवर्धक व कातळशिल्प अभ्यासक) व डॉ केतन चौधरी, प्राध्यापक व वरिष्ठ संशोधक यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात साडवली गावचे सरपंच श्री. राजेश जाधव साहेब, संगमेश्वर तालुका प्रभारी तहसीलदार श्री. समर्थ क्षीरसागर, जेष्ठ सामाजिक कार्यकते श्री.युयुत्सु आर्ते, नायब तहसीलदार श्री.आढाव साहेब, श्री. पंडीत रावसाहेब इत्यादी मान्यवरांची उपस्थिली लाभली होती.



## नवीन प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांचे स्वागत






०१ सप्टेंबर २०२३ रोजी आय टी आय मध्ये प्रवेश ऑगस्ट २०२३ मधील नविन प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांचे स्वागत कार्यक्रम आयेजीत करण्यात आला.सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मातृमंदिर संस्थेचे कार्यवाह श्री.विनय पानवलकर सर, व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सतिश शिर्के सर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झला.



## दहिहंडी

दिनांक ०६ सप्टेबर २०२३ रोजी आय टी आय मध्ये डोळयाला पटटी बांधून मटकी फोडणे कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमामध्ये सर्व प्रशिक्षणार्थ्यांना सहभाग घेवून उत्सव साजरा केला

## Skill Run मॅरेथॉन स्पर्धा – २०२३





व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या निदेशानुसार रविवार दिनांक १७ सप्टेंबर २०२३ रोजी PM Skill Run मॅरेथॉन स्पर्धा आयोजीत करण्यात आले.हि स्पर्धा ४ किलो मिटर ची असून ती आय टी आय मधून सुर करण्यात आली. स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी तालुका BDO मा.भारत चौगले, देवरख नगरपंचायतचे प्रशासक मा.चेतन विसपुते, साडवली गावचे सरपंच श्री. राजेश जाधव, राष्ट्रीय कब्बडडीपटू श्री. संतोष दामुष्टे, क्रांती व्यापारी असोशियनचे अध्यक्ष व प्रसिध्द हॉकी प्रशिक्षक श्री.निखिल कोळवणकर,

सामाजिक कार्यकर्ते श्री.युयुत्सु आर्ते, पोलीस निरीक्षक श्री. महेश मुरडकर, सायले PHC चे डॉ.दैत यांची प्रमुख उपस्थिती होती. एकूण ६५ प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेसाठी वनाज इंजिनिअर्स, एडलर हेल्थकेअर, क्रांती व्यापारी संघटना, लाईफ केअर मेडीकल, स्वामी समर्थ फोटो लॅब, आय टी आय कर्मचारी यांनी आर्थिक व वस्तू स्वरपात मदत केली. तसेच क्रांती व्यापारी संघटना सदस्य, सहयाद्रीनगर मित्रमंडळ, वाघजाई मित्र मंडळ यांच्या स्वयंसेवकांनी स्पर्धेच्या व्यवस्थेमध्ये मदत केली.

## दीक्षांत समारंभ व मॅरेथॉन बक्षीस वितरण सोहळा





अखिल भारतीय व्यवसाय परीक्षा जुलै २०२३मध्ये उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे दीक्षांत समारंभ व RUN FOR SKILL मॅरेथॉन स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम मा.तहसीलदार अमृता सबळे मॅडम, संस्थेचे कार्याध्यक्ष श्री.अभिजित हेगशेटये, कोषाध्यक्ष श्री.अनिल अणेराव , ॲडलर हेल्थ केअरचे श्री. गद्रे, सामाजिक कार्यकर्ते श्री.युयुत्सु आर्ते, संस्थेचे सेक्रेटरी श्री. विनय पानवलकर आणि आय टी आय चे प्राचार्य श्री.समीर हेगशेटये यांच्या उपस्थितीत पार पडला.

## तंत्र प्रदर्शन – २०२४

दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजी विज्ञानदिना निमित्त तंत्रप्रदर्शन – २०२३ आयोजित करण्यात आले. कार्यक्रमासाठी संस्थेचे कार्योपाध्यक्ष श्री.सुनिल कोळवणकर, कोषाध्यक्ष श्री. अनिल अणेराव व कार्यवाह श्री. विनय पानवळकर यांच्या हस्ते तंत्रप्रदर्शन कार्यक्रमाचा उदघाटन सोहळा करण्यात आला. तंत्र प्रदर्शनासाठी परीक्षक म्हणून आय.टी.आयचे सेवानिवृत्त प्राचार्य श्री.समीर हेगशेटये सर व वनाज इंजिनिअरर्स लि. साडवली चे सहाय्यक प्रबंधक श्री.मंगेश सरदेसाई यांनी कामकाज पाहिले.




# समाजभान वाचन कटटा



दिनांक ०६ जानेवारी २०२४ रोजी आय.टी.आय मध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी समाजभान वाचन कटटयाचे साडवली गावचे प्रभारी सरपंच सौ.सान्वी खरात व इतर मान्यवरांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.



रक्तदान समुपदेशन

## प्रसाद बालक मंदिर – मातृमंदिर देवरुख

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ या सालामध्ये पटावरील संख्या १०७ होती त्यापैकी ५८ मुले व ४९ मुली होत्या.
अंकुर २६ मुलगे १२ मुली
पालवी १५ मुलगे २० मुली
फुलोरा १७ मुलगे १७ मुली

१५ जून २०२३ रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी नवागतांचे स्वागत फुगे आणि चॉकलेट देवून करण्यात आले.
२९ जून २०२३ रोजी आषाढी एकादशी साजरी करण्यात आली.
३ जुलै २०२३ रोजी गुरुपौर्णिमा साजरी केली.
१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिना निमित्त मुलांनी देशभक्तीपर गीत म्हटले.
१८ ऑगस्ट २०२३ रोजी नागपंचमी निमित्त शाडूच्या मातीचे नाग तयार करुन रंगवून घेतले. श्री. विलास कोळपे यांच्याकडून प्रोजेक्टरवर सापांची माहिती देण्यात आली.
रक्षाबंधन, दहीहंडी, गणेश उत्सव साजरा करण्यात आला मुख्य प्रवेशव्दारापासून वाजत गाजत गणपतीचे आगमन झाले. मुलांना गणपतीची पूजा व आरती केली.
गांधी पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक, माजी प्राचार्य डॉ सुरेश जोशी सरांनी चिमुकल्यांसोबत संवाद साधला त्यावेळी आपल्या सर्वांच्या घरी महात्मा गांधीजींचा फोटो असावा असे सांगितले.
२१ ऑक्टोबर २३ रोजी शाळेत पाटीपूजन करण्यात आले. देसाई बाई यांनी पाटीचे महत्व सांगितले.
८ नोव्हेंबर २३ रोजी शाळेत पर्यावरण पूरक दिपोत्सव साजरा करण्यात आला. दीपोत्सव निमित्ताने मुलांकडून मातीच्या पणत्या तयार करुन रंगवून घेतल्या. मुलांना शुभेच्छा म्हणून भेटकार्ड एकमेकांना देण्यात आली. सर्वांना फराळ देण्यात आला.
१६ डिसेंबर २०२३ रोजी विघ्नवली पालकर फार्म येथे मुलांची सहल नेण्यात आली –शेळीपालन, लाकडाच्या भूष्यापासून विटा तयार करणे, काजूच्या सालीचे तेल काढणे, बाग इ. मुलांना दाखविण्यात आले.
स्नेहसंमेलन निमित्ताने यलो डे, साडी डे, टाय डे इ. डे साजरे करण्यात आले.

अंकुर गट, पालवी गट व फुलोरा गट या गटांमध्ये क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या.

२६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनाला झेंडावंदन करतांना मुलांनी थोर देशभक्तांच्या वेशभूषा केल्या होत्या.

३ फेब्रुवारी २०२४ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मनोविकार तज्ञ डॉ. ऋतिका कोतकुंडे – चिपळूण, लेखक अनुवादक ऋतुजा खरे – चिपळूण, मातृमंदिरचे कार्योपाध्यक्ष श्री. सुनिल कोळवणकर कार्यवाह श्री विनय पानवळकर हे उपस्थित होते.

अहवालसाली मुलांसाठी स्टेशनरी – वह्या, गाड्या, चेंडू, फोटो, रंगीत कलर इ. स्वरुपातही देणगी प्राप्त झाली.




प्रसाद बालक मंदिर नवोदितांचे स्वागत





**प्रसाद बालक मंदिर मध्ये दिपोत्सव कार्यक्रम**



**प्रसाद बालक मंदिर मध्ये सरस्वती पूजन कार्यक्रम**

# प्रा. मधु दंडवते कृषि तंत्र विद्यालय, ओझरे

प्रा. मधु दंडवते कृषि तंत्र विद्यालय, ओझरे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ मान्यताप्राप्त
प्रथम वर्ष व व्दितीय वर्ष कृषी पदविका अभ्यासक्रमाचा निकाल १०० टक्के लागला असून यामध्ये प्रथम वर्षाचे २४ तर व्दितीय वर्षाचे २९ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. प्रथम वर्षातील प्रथम क्रमांक कु. लौकिक तुकाराम गिते, व्दितीय क्रमांक कु. सिध्दी सुनिल कस्पले, तृतिय क्रमांक कु. सागर श्रीकांत पाजवे त्याच प्रमाणे व्दितीय वर्षातील प्रथम क्रमांक कु. अनुष्का निलेश नलावडे, व्दितीय क्रमांक कु. कोमल मारुती मोहिरे, तृतिय क्रमांक कु. अभिषेक आत्माराम घडशी यांनी मिळविला.
व्दितीय वर्षाचे कामकाज दि. १५ जून २०२३ रोजी सुरु झाले.
दिनांक १ जुलै २०२३ रोजी कृषी दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

प्रथम वर्षाचे कामकाज दि. १४ ऑगस्ट २०२३ रोजी सुरु झाले. प्रथम वर्षात १५ विद्यार्थी प्रवेशित झाले.
१५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्य दिन , २ आॅक्टोबर २३ रोजी महात्मा गांधी जयंती व लाल बहाद्दूर शास्त्री जंयती,
२० ऑगस्ट २०२३ – सरस्वती पूजन
८ ऑक्टोबर २०२३ इंदिराबाई हळबे मावशी स्मृती दिन
६ डिसेंब २०२३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन
२६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिन इ. कार्यक्रम विद्यालयाकडून घेण्यात आले.



६ जानेवारी २०२४ रोजी चिपळूण येथे वाशिष्टी तर्फे भरवण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनाला सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांनी भेट दिली.



२६ फेब्रुवारी २०२४ रोजी दापोली येथून अधिक्षक परमस्नेही मॅडम यांनी विद्यालयाला परिक्षेची कागदपत्रे देण्यासाठी भेट दिली.

# मातृमंदिर संचलित पशुधन व्यवस्थापन व दुग्ध उत्पादन पदि्वका विद्यालय ओझरे

मातृमंदिर संचलित पशुधन व्यवस्थापन व दुग्ध उत्पादन पदविका विद्यालय ओझरे (महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यान विद्यापीठ, नागपूर मान्यताप्राप्त )

रत्नागिरी जिल्ह्यातील पहिल्या पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका महाविद्यालयाचा वाशिष्टी मिल्क ॲन्ड प्रोडक्शन प्रा. लि. चे अध्यक्ष प्रशांत यादव आणि रत्नागिरी मत्स्य विद्य़ालयाचे प्राध्यापक व वरिष्ठि संशोधक डॉ. केतन चौधरी यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात उद्घाटन झाले.

दिनांक २२ सप्टेंबर २०२३ रोजी प्रथम वर्षाचे कामकाज चालू झाले. प्रथम वर्षाची प्रवेश क्षमता ६० विद्यार्थी आहे. प्रवेश क्षमतेप्रमाणे सर्व प्रवेश झाले. त्यापैकी ५३ मुले व ७ मुली आहेत.

१५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्य दिन , २ आॅक्टोबर २३ रोजी महात्मा गांधी जयंती व लाल बहाद्दूर शास्त्री जंयती,

२० ऑगस्ट २०२३ – सरस्वती पूजन

८ ऑक्टोबर २०२३ इंदिराबाई हळबे मावशी स्मृती दिन

६ डिसेंब २०२३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

२६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिन इ. कार्यक्रम विद्यालयाकडून घेण्यात आले.

६ जानेवारी २०२४ रोजी चिपळूण येथे वाशिष्टी तर्फे भरवण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनाला सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांनी भेट दिली.

१०.०१.२०२४ रोजी सन २०२४–२५ करिता पशुधन पदविका अभ्यासक्रमाच्या मान्यतेकरिता नागपूर विद्यापीठ व शिरवळ घटक महाविद्यालय येथून अधिकारीवर्ग मूल्यमापनाकरिता आले होते. त्यावेळी मातृमंदिर संस्थेचे पदाधिकारी व विद्यालयाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.



**विद्यापिठ संचालक राजेश वानखेडे यांना मातृमंदिरचे कार्याध्यक्ष श्री अभिजित हेगशेट्ये कोकणच्या सावित्रीबाई मावशी पुस्तक भेट देताना**




**प्रथम वर्षातील मुलांसाठी कृत्रिम रेतन या विषयावर डॉ. शिंदे यांचे व्याख्यान पार पडले.**



**प्रथम वर्षातील विद्यार्थी चारा पीक (मका) फवारणी करताना**



सांगोला बाजर येथून खरेदी केलेल्या दोन गाई

**ऋतुसंवाद शिबिर**

वर्षभरातील ऋतु आणि ऋतुप्रमाणे होणारे बदल निरीक्षणाने समजून घेण्याची एक दृष्टी मुलांमध्ये निर्माण व्हावी व हे बदल आपल्या आयुष्याशी कसे निगडीत आहेत याचा विचार करायला मुलांना उद्युक्त करावे यासाठी ऋतुसंवाद शिबीर मालिकेतील २ शिबीरे अहवालकाळात मातृमंदिर शेती फार्म ओझरे येथे तीन दिवशीय निवासी शिबीरे घेण्यात आली. ९ ते १४ वर्षे वयोगटातील बालमित्रांसाठी उन्हाळी सुट्टीतील धमाल शिबीर – ऋतुप्रमाणे बदलणारा भवताल अनुभवण्यासाठी संस्कार शिबिरांचा ५४ वर्षाचा वारसा असलेल्या मातृमंदिर देवरुखच्या शेती फार्म ओझरे येथे १८ ते २१ एप्रिल २०२३ व १६ ते १९ नोव्हेंबर २०२३अशा दोन निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरामध्ये उन्हाळ्यातील निसर्ग घटकांचे निरिक्षण विषेष उपकरणांच्या आधारे करण्यात आले. या शिबीरांचे खास उपक्रम नेचर ट्रेल बनविणे वैज्ञानिक खेळणी व प्रयोग, वारली पेंटींग, नैसर्गिक रंग वनलिणे, ओरोगामी आकाश दर्शन, एडव्हेन्चर ॲक्टीव्हीटी, मातीकाम धम्माल गाणी व अनोखे खेल  सोबतच फळझाडे, फुलझाडे, भाजी लागवड, मसाला पिके, गुरांचा गोठा गांडुळ प्रकल्प, मधुमक्षिका पालन, सेंद्रीय खते प्रकल्प, औषधी वनस्पती प्रकल्प, रोपवाटीका इ. प्रकल्पांना भेट.

**युवा संवाद शिबीर**

दि. २४ ते २८ नोव्हेंबर २०२३ रोजी पाच दिवसांचे युवा संवाद शिबीर मातृमंदिर शेती फार्म ओझरे येथे घेण्यात आले. या शिबीराचे उद्घाटक श्री.राजेंद्र केरकर ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक व कार्यकर्ता गोवा यांनी केले. तसेच सुमित संजय संविधान प्रचारक लोकचळवळ रायगड यांनी १३ जिल्ह्यातून आलेल्या तरुणाईसोबत संविधान विषयक जाणिव जागृती व्हावी म्हणून कार्यशाळा घेतली. यानिमित्ताने महाराष्ट्रातल्या तरुणाईला स्वत:शी व भवतालाशी संवाद साधण्याचा व्यासपीठ उपलब्ध होत आहे.

**अनुभूती शिबीर**

८ ते ११ मे २०२३ रोजी मातृमंदिर शेती फार्म ओझरे अनुभूती शिबीर घेण्यात आले. पाच जिल्ह्यातून आलेल्या ४२ विद्यार्थ्यांचा या शिबीरामध्ये सहभाग. या शिबिरासाठी मातृमंदिरचे कार्याध्यक्ष श्री अभिजित हेगशेट्ये, उपाध्यक्ष श्री. विलास कोळपे, कार्यवाह श्री विनय पानवळकर, सामाजिक कार्यकर्ते श्री युयुत्सु आर्ते यांनी मार्गदर्शन केले.

**आरोग्य तपासणी शिबिर**

मातृमंदिर देवरुख आणि कॅन्सर पेशंट एड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिर २१ एप्रिल २०२३ रोजी मातृमंदिर देवरुख येथे घेण्यात आले कॅन्सर पूर्व तपासणीसह, रक्त तपासणी, नाक कान घसा तपासणी, महिला व पुरुषांचे आरोग्य तपासणी असोसिएशनच्या एक्सिक्युटीव्ह डॉक्टर नीता मोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रसिध्द सर्जन डॉ रविंद्र अंबार्डेकर, गायनाकॉलॉजिस्ट डॉ. तृप्ती पोयेकर, फिजीशियन वीणा बोरकर तसेच लॅब टेक्नीशियन व सहका–यांच्या मदतीने शिबीरामध्ये रुग्णांची तपासणी करण्यात आली.

बुधवार वाचन गट – बुधवार वाचन गटात सायंकाळी ६ ते ८ या वेळात पुस्तकांवर, चालु घडामोडींवर सकारात्मक चर्चा असते. काही वेळेला आधी विषय सूचविला जातो व त्यावर उपस्थित भाष्य करतात. अहवालसाळी १०० वा वाचन बुधवार साजरा करण्यात आला.

मातृमंदिर देवरुखच्या संस्थापिका हळबे मावशी यांच्या २५ वा स्मृतीदिन कार्यक्रमानिमित्त मनोविकास प्रकाशनचे संस्थापक अरविंद पाटकर, सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका दिपा देशमुख, लेखक अर्थतज्ञ डॉ. नितीन हंडे यांची प्रमुख उपस्थिती.

मातृमंदिर देवरुखचे माजी कार्याध्यक्ष विजय ( भाऊ) नारकर यांचा १० ऑक्टोबर २०२३ रोजी स्मृतीदिन साजरा करण्यात आला.

**गौरव**

मातृमंदिर करीत असलेल्या विविध क्षेत्रातील सामाजिक कामांची दखल म्हणून लांजा, राजापूर, संगमेश्वर तालुका उत्कर्ष मंडळातर्फे मानपत्र देवून संस्थेचा गौरव

पुरस्कार

लोटे परशुराम उद्योजक संघटनेच्या वतीने कोकणात उल्लेखनीय कार्य करणा-या मातृमंदिर संस्थेला कोकण गौरव पुरस्कार

मातृमंदिर संस्थेच्या सामाजिक, शैक्षणिक , महिला बालकल्याण आणि आरोग्य विषयक कार्याची दखल घेत हुतात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्था क-हाड यांचेकडून १० वा कोकण गौरव पुरस्कारासाठी मातृमंदिर संस्थेची निवड

अखिल भारतीय भंडारी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष नवीनचंद्र बांदविडेकर यांच्या हस्ते मातृमंदिरचे कार्याध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार, लेखक अभिजित हेगशेट्ये यांचा प्रतिभावान व्यक्ती पुरस्कार देउन सन्मान

भेटी

मंडणगड तालुक्यातील स्नेहज्योती अंध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची मातृमंदिर संस्थेस भेट

महिंद्रा अँड महिंद्रा को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी, कांदिवली मुंबई च्या पदाधिकारी व सदस्यांची मातृमंदिरला भेट

स्वाधार संस्था पुणे येथील टीमची दि. १६.०२.२४ रोजी मातृमंदिर संस्थेला भेट

पुणे येथील ताराचंद रामनाथ सेवा ( तारा) ट्रस्ट तर्फे दिल्या जाणा-या आत्मानिर्भर ग्रॅमटसाठी देवरुख येथील मातृमंदिर संस्थेची निवड

मातृमंदिर कार्यकारीणी माजी संचालक एम.बी.साखळकर यांचे अहवाल सालात निधन

जलगांव चेपडा येथील बी एस डब्ल्यू. विद्यार्थ्यांची मातृमंदिरला भेट

स्वाधार संस्था पुणे येथील टीमची मातृमंदिरला भेट

NAB ( National Association for the Blind) च्या कोल्हापूर जिल्ह्यातील ३० अंध युवक युवती.

झी २४ तास चे संपादक निलेश खरे यांनी मातृमंदिरला भेट दिली. मातृमंदिरचा इतिहास व सध्याचे विविध उपक्रमांच्या माध्यमातून सुरु असलेले काम समजून घेतले. अशा संस्था टिकल्या व वाढल्या पाहिजेत असे त्यांनी सांगितले.

MP Ensystems कडून मातृमंदिर फार्मसाठी सोलर ड्रायर विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यासाठी उपयुक्त होणारे अत्याधुनिक कंट्रोलपॅनलसह उत्तम मिटेरियलची बांधणी असलेले व ४० क्षमतेचे हे सोलर ड्रायर रु. १,५०,०००/- बाजारमुल्य असलेले आहे. पुण्यातील energy Guru या कंपनीने बनविलेले हे ड्रायर मातृमंदिर शेती फार्मवर इंस्टॉल झाले. या कामी पर्यावरण तज्ञ नितीन पंडित सर यांची मोलाची मदत झाली. तसेच MP Ensystems चे डॉ. महेश पाटणकर, प्राजक्ता मॅडम, कौत्सुभसर आणि सर्व सहकारी यांची मदत लाभली.




मातृमंदिर देवरुखच्या संस्थापिका इंदिराबाई हळबे मावशी यांचा २५ वा स्मृतीदिन कार्यक्रमानिमित्त मनोविकास प्रकाशनचे संस्थापक अरविंद पाटेकर, सामाजिक कार्यकर्त्या लेखिका दिपा देशमुख, लेखक अर्थतज्ञ डॉ नितिन हंडे, माजी प्राचार्य डॉ.सुरेश जोशी, मातृमंदिरचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये इ.




स्नेह मेळावा सहभागी गोकुळचे माजी विद्यार्थी




मातृमंदिर देवरुखच्या संस्थापिका हळबे मावशी यांच्या २५व्या स्मृतीदिन कार्यक्रमा निमित्त मनोविकास प्रकाशन चे संस्थापक अरविंद पाटकर ,सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका दिपा देशमुख, लेखक अर्थतज्ञ डॉ. नितीन हंडे, माजी प्राचार्य डॉ.सुरेश जोशी, मातृमंदिरचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये इ.



महिंद्रा ॲन्ड महिंद्रा को. क्रे. सोसायटी कांदिवली, मुंबई यांच्याकडून संस्थेला मदतीचा चेक स्विकारताना



हुतात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्था, कराड व मातोश्री स्वयंसेवी संस्था व हातभार फौंडेशन, रत्नागिरी, १० वा राज्यस्तरीय कोकण गौरव पुरस्कार २००४ साठी मातृमंदिर देवरुख या संस्थेची निवड - श्री. उदय बने माजी जि.प. अध्यक्ष यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारतांना कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये, कोषाध्यक्ष अनिल अणेराव व संचालक संदेश शेट्ये

# गोकुळ

मागील ६५ वर्षे शेकडो मुलांना आधार देणारा मातृमंदिरचा अतिशय महत्वाचा व तितकाच जबाबदारीचा विभाग गोकुळ म्हणजे एक कुटुंब आहे. यामध्ये मुलींचे संगोपन, आरोग्य, शिक्षण, प्रशिक्षण, आणि पुनर्वसन केले जात आहे. यावर्षी नवीन दाखल मुलींची भर पडत असून संस्था मूल्य आणि मानवतावादी विचार देखील देत आहे.

गोकुळ प्रवेशित संख्या ( २३-२४ ) २६ मुली
इयत्ता १ली ते ५ वी - ४ मुली
इयत्ता ६ वी ते १० वी -१० मुली
इयत्ता ११ वी ते १२ वी - ०७ मुली
मातृमंदिर औद्योगिक प्रशिक्षण केंद्र - ५ मुली
नविन प्रवेशिता -०७

एप्रिल २०२३ मध्ये - फार्म फेरी, आपत्ती व्यवस्थापन परिक्षा, ऋतुसंवाद शिबीरामध्ये सहभाग, संस्थातर्गत क्रिडा महोत्सव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इ. कार्यक्रम.

मे २०२३ मध्ये अनुभूती शिबीर स्वयंसेवक, स्नह मेळावा, हेदर हेगशेट्ये यांच्याशी भेट, नविन दाखल प्रवेश. कुडाळ, सावंतवाडी, दोडामार्ग, गोवा या ठिकाणी वार्षिक सहल नेण्यात आली. मासिक पाळी, स्वच्छता दिन – प्रा. आरती पानवळकर यांचे संवादसत्र झाले.

जून २०२३ मध्ये उत्तीर्ण मुलींचे सत्कार, व सदिच्छा, श्री. वैभव मांगले चांची भेट, ५५ ACT and pocso Training.

जुलै २०२३ मिलेट सप्ताहानिमित्ता मार्गदर्शन सत्र व भात लावणी सहभाग

ऑगस्ट २०२३ – १५ ऑगस्ट २०२३ रोजी गीत गायन व पथनाट्य कार्यक्रम व रक्षाबंधन कार्यक्रम साजरा करण्यात आला. बँकेचा कामकाज समजून घेणेसाठी अपना सहकारी बँक, देवरुख शाखेत भेट.

सप्टेंबर २०२३ – दही हंडी, गणेशोत्सव, समानतेचा मोरया  देवरुख नगर पंचायत व लायन्स क्लब देवरुख यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियान ४.० व स्वच्छ सर्व्हेक्षण २०२४ अंतर्गत घेण्यात आलेल्या इको फ्फ्रेंडली गणेशोत्सव स्पर्धेत मातृमंदिर गोकुळ बालगृहाने प्रथम क्रमांक पटकावला. शिल्ड, प्रमाणपत्र व रोख रक्कम असे पारितोषिकाचे स्वरुप होते. पर्यावरण पूरक वस्तूंची सजावट, स्त्री सन्मानाचा व समानतेचा सामाजिक संदेश , पर्यावरण पूरक गणेशमूर्ती व विसर्जन या सगळ्याच मुद्द्यावर गोकुळचा समानतेचा मोरया या स्पर्धेत अव्वल ठरला. , त्रैमासिक आरोग्य तपासणी.

ऑक्टोबर २०२३ – टीकलेश्वर सहल, मावशी हळबे स्मृतिदिन, कोजागिरी पौर्णिमा इ. कार्यक्रमात सहभाग अंधमुलांसह गोकुळची संवाद भेट,

नोव्हेंबर २०२३ – दिवाळी प्रदर्शन यामध्ये पणत्या व कंदिल बनवून विक्रि करण्यात आली, प्रसाद बालक मंदिराच्या पर्यावरण पूरक दिवाळी या कार्यक्रमावेळी गोकुळचा स्टॉल लावण्यात आला.  मुरुड जंजिरा किल्ला प्रतिकृती मुलींनी बनविली. ऋतुसंवाद शिबीराच्या पूर्व तयारीत मुलींनी रंगकाम केले व स्वयंसेवक व शिबिरार्थी म्हणून शिबीरात सहभाग, दिवाळी पहाट कार्यक्रम यांदा सलोख्याची दिवाळी म्हणून साजरी करण्यात आली, इ. कार्यक्रम साजरे करण्यात आले. दुर्बिणीव्दारे मुलींना आकाश दर्शन घडविण्यात आले हे सत्र सुमित फडणीस यांनी घेतले.राज्यस्तरीय युवा संवाद शिबीरामध्ये सहभाग, वात्सल्य मंदिर ओणी येथील आनंदमेळा कार्यक्रमात सहभाग.

डिसेंबर २३ –  डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन , बालकल्याण समिती व जिल्हा महिला व बालविकास विभाग यांच्या वतीने घेण्यात बालमेळाव्यात मुलींनी रांगोळी स्पर्धा, नृत्ये स्पर्धा लहान गट यामध्ये प्रथम क्रमांक, किल्ला स्पर्धा, गीतगायन स्पर्धा यामध्ये व्दीतीय क्रमांक व नृत्य स्पर्धा मोठा गट यामध्ये उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला. ख्रिसमसदिन साजरा करण्यात आला.

जानेवारी २४ –  नविन वर्षाचे स्वागत सावित्री उत्सव सावित्रीची मूर्ती बनवून केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. अनुभूती शिबिरात मुलींचा स्वयंसेवक म्हणून सहभाग, प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात गीत गायन व संचलन सहभाग, जिल्हा महिला व बालविकास आयोजित चाचा नेहरु बालमहोत्सव रत्नागिरी येथील स्पर्धामध्ये घवघवीत यश

फेब्रुवारी २४ – मुंबई येथील कोकणविभागीय बालमहोत्सवमध्ये गोकुळच्या मुलींचा सहभाग. आर्ट कॉलेज मध्ये शिकणा–या गोकुळ प्रवेशितेची चित्रे स्नहसम्मेलन प्रदर्शनात प्रदर्शित झाली. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शिवाजी महाराज यांची रांगोळी रेखाटली.

मार्च २४ –  स्वच्छतेची मोहिम राबवून (झाडांची सुकी पाने ) कच–याची होळी करण्यात आली. राग दोष मत्सर हे सर्व होळीत दहन करुन एकोपाची भावना निर्माण केली.



प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात गोकुळच्या मुलींनी संचलन व कलापथक सादर केले.




समानतेचा मोरया गोकुळ गणपती



देवरुख नगर पंचायत व इको फ्रेंडली गणेशोत्सव स्पर्धेत प्रथम क्रमांक पारितोषिक प्राप्त समानतेचा मोरया गोकुळ देणगी २३–२४

# मातृमंदिर देवरुख मुख्य विभाग - देणगी २०२३-२४

| अ.क्र. | देणगीदाराचे नांव | पत्ता | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. कुमार दत्तात्रय ननावरे | पुईखडी, कोल्हापूर | 11,000 |
| 2 | श्री. प्रकाश बाळकृष्ण माचीवले | मुलुंड, मुंबई | 24,000 |
| 3 | श्री. विजय शिवराम पंदेरे | वांझोळे, संगमेश्वर | 11,000 |
| 4 | स्मिता सुरेश वेदपाठक | बोरीवली, मुंबई | 11,151 |
| 5 | प्रियांका प्रकाश कुडव | मालाड, मुंबई | 5,000 |
| 6 | श्री.मधुसुदन जोशी | पौंड रोड, पुणे | 2,501 |
| 7 | श्रीमती कांचन विठ्ठल जाधव | साडवली, संगमेश्वर | 501 |
| 8 | श्रीमती सुलभा एकनाथ कोलगे | माजीवडा, ठाणे | 2,000 |
| 9 | श्री.अनंत माधव | | 5,000 |
| 10 | श्री प्रसाद रसाळ | डेक्कनजिमखाना, पुणे | 25,001 |
| 11 | श्री. दत्ताराम राजाराम संसारे | कोथरुड, पुणे | 25,000 |
| 12 | श्री. संजय बापट | वीले-पार्ले, मुंबई | 15,000 |
| 13 | प्रिया दिलीप | | 2,500 |
| 14 | मा.विश्वस्त, श्रीदेवी अंबाबाई गोरेगाव ट्रस्ट | गोरेगांव, मुबई | 150,000 |
| 15 | श्री. चंद्रकांत आत्माराम राणे | कणकवली | 10,000 |
| 16 | श्रीमती वासंती विनायक मसूरकर | माहिम, मुंबई | 10,000 |
| 17 | महिंद्रा आणि महिंद्र कंपनी | कांदीवली, मुंबई | 75,000 |
| 18 | श्री. पी.एस. करंदीकर | पिंपरी, पुणे | 10,000 |
| 19 | श्री. श्रीकांत धोडो सातपूते | डोंबीवली, ठाणे | 4,711 |
| 20 | श्रीमती योगिता राजेश खातू | | 5,000 |
| 21 | श्री. लवकुमार शंकरराव बंदे | सातारा | 10,000 |
| 22 | श्री. विजय केशव करंबेळकर | मुलुंड, मुंबई | 5,000 |
| 23 | वनाझइंजिनिअर्स लि., पुणे | कोथरुड, पुणे | 50,000 |
| 24 | श्री. तुषार भास्कर तांबे | दादर, मुंबई | 10,000 |
| 25 | श्री. अविनाश दामोदर बर्वे | कर्वेनगर पुणे | 5,000 |
| 26 | श्रीमती सिमालीचंद्रकांत धुळप | | 2,000 |
| 27 | श्री.अजय अनंत | | 2,000 |
| 28 | दी टोपीवाला मेमोरिअल ट्रस्ट | मुंबई | 40,000 |
| 29 | मा. कार्यकारी विश्वस्त गोपाळ वामन पोतनीस चॅरीटेबल ट्रस्ट, मु | मुंबई | 8,000 |
| 30 | श्री.अशोक श्रीकृष्ण बेहरे | पुणे | 1,000,000 |
| 31 | तारा बिल्डर्स | डेक्कन जिमखाना, पुणे | 750,000 |
| 32 | श्री. भूषण खातू | माजीवडा, ठाणे | 1,001 |
| 33 | श्री. केतनचंद्रकांत परब | चेंबूर, मुंबई | 12,000 |
| | | | **22,99,336** |

# प्रसाद बालक मंदिर देणगी २०२३-२४

| अ.क्र. | देणगीदाराचे नांव | पत्ता | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | मिलिंद प्रभाकर देसाई | चिपळूण | 5,001 |
| 2 | विवेक गोविंद खाडिलकर | बोरीवली, मुंबइ | 13,500 |
| 3 | सुरेखा जयंत मेहेदळे | बोरीवली, मुंबइ | 5,000 |
| 4 | नितीन बगाराम मोरे | देवरुख | 700 |
| 5 | विनया.कृष्णा कानार | देवरुख | 501 |
| 6 | दिपक मनोहर भाटकर | देवरुख | 500 |
| 7 | शरयू पाटील | चेंबूर, मुंबई | 5,000 |
| 8 | उमेश मुरलीधर धामणस्क | देवरुख | 500 |
| 9 | अमित सुरेश घडशी | देवरुख | 501 |
| 10 | प्रियांका अजय सुर्यवंशी | देवरुख | 200 |
| 11 | अविनाश प्रकाश जागुष्टे | देवरुख | 500 |
| 12 | प्रकाश शंकर नाईक | बोरीवली, मुंबइ | 4,000 |
| 13 | प्रभाप्रभाकर गाडगीळ | बोरीवली, मुंबइ | 25,000 |
| 14 | स्वाती आाकाश करंडे | देवरुख | 200 |
| 15 | लक्ष्मी गजानन मोघे | देवरुख | 501 |
| 16 | तिर्था गौरव लिंबूकर | देवरुख | 501 |
| 17 | पुष्पा जनार्दन घाणेकर | बोरीवली, मुंबइ | 11,000 |
| 18 | स्वरा प्रविण पाटील | देवरुख | 500 |
| 19 | आदर्श अभिजित शिंदे | देवरुख | 500 |
| 20 | दुर्वा प्रथमेश सागवेकर | देवरुख | 300 |
| 21 | सिध्दी अजित बांडागळे | देवरुख | 500 |
| 22 | माहिरा मिथून रेवणे | देवरुख | 1,000 |
| 23 | सुहास शांताराम गोपाळ | देवरुख | 1,000 |
| 24 | दिनेश जयराम खाके | देवरुख | 250 |
| 25 | उर्वी सागर किल्लेदार | देवरुख | 1,001 |
| 26 | मनोहर ब्रीद | देवरुख | 500 |
| | | | 78,656 |

# गोकुळ विभाग देवरुख

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | वैभव नंदकुमार टीबे | तेरे, बुरंबी,संगमेश्वर | 3,500 |
| 2 | वैशाली माधव वेलणकर | पनवेल, मुंबई | 60,000 |
| 3 | अंकिता सुनिल येवळे | भांडूप, मुंबई | 1,000 |
| 4 | अंजली प्रसाद माने | माणगांव, रायगड | 26,400 |
| 5 | रीझवान अब्दुलगणी वास्ता | राजापूर | 4,000 |
| 6 | चंदा चंद्रकांत पाडळकर | देवरुख | 2,000 |
| 7 | अनन्या आनंद ब्रीद | देवरुख | 1,000 |
| 8 | राहूल संभांजी शिंदे | देवरुख | 2,000 |
| 9 | नंदीश पारेख | मुलुंड, मुंबई | 5,000 |
| 10 | गितांजलीजागुष्टे | ओझरे, देवरुख | 10,000 |
| 11 | अभिजित चंद्रकांत शेटेचे | देवरुख | 11,000 |
| 12 | दिव्या राजेंद्र चव्हाण | देवरुख | 2,500 |
| 13 | युयुत्सु रमाकांत आर्ते | देवरुख | 500 |
| 14 | फार्मसी कॉलेज देवरुख ग्रुप | देवरुख | 1,001 |
| 15 | महेश ऋानदेव कदम | कळवा, ठाणे | 4,000 |
| 16 | मनिषा बालकृष्ण शिरधनकर | झाडगांव रत्नागिरी | 5,000 |
| 17 | सुषमा संजय खेतले | नौपाडा, टाणे | 22,500 |
| 18 | मदन वामन मोडक | देवरुख | 2,000 |
| 19 | सुखदा सुरेश वैशंपायन | ठाणे | 5,000 |
| 20 | वैभव विजय कुटे | जेंबिवली, मुंबई | 25,000 |
| 21 | धनश्री देशपांडे | कोथरुड | 1,001 |
| 22 | संदेश शेटये | साखरपा | 1,600 |
| 23 | वैभव विठ्ठलवनाळे | नाचणे, रत्नागिरी | 7,000 |
| 24 | सुनिल कृष्णा करंबळे | गुरुकुलनगर | 1,110 |
| 25 | फाल्गुनी गणेश पाटील | करमाळी, रायगड | 3,400 |
| 26 | अशोक लोटणकर | भोईरनगर | 3,000 |
| 27 | दिलीप फडके | देवगड | 10,000 |
| 28 | गजानन शंकर रहाटे | साडवली | 3,000 |
| 29 | ओकार अरुण पवार | देवरुख | 5,500 |
| 30 | सुलभा पवार | देवरुख | 5,000 |
| 31 | प्रशांत शांताराम सावंत | मुलुंड, मुंबई | 50,000 |
| 32 | यासिन खतीब | देवरुख | 4,000 |
| 33 | अभिजित भास्कर शहाणे | वडगांव बु. पुणे | 10,000 |
| 34 | मदत वेलफेअर ट्रस्ट | पुणे | 10,000 |
| 35 | विलास गणपत कामेरकर | माहिम मुबई | 1,000 |
| 36 | जितेश लक्ष्मण चव्हाण | अहमदनगर | 4,500 |
| 37 | धनंजय भास्कर देशमुख | धनकवडी, पुणे | 1,100 |
| 38 | सुमित संजय फडणवीस | जळगां, लातूर | 4,600 |
| 39 | देवरुख हायस्कूल 1992 बॅच | देवरुख | 500 |
| 40 | शगुन इंडस्ट्रीज प्रा. लि. | पुणे | 51,000 |
| 41 | प्रणव प्रविण देवघरकर | पनवेल, मुंबई | 7,000 |
| 42 | आरती सुधिर बने | कोळीवाडा, मुबई | 2,000 |
| 43 | रघुनाथ | | 5,000 |
| 44 | अमन अशोक तानगडे | बीड | 4,500 |
| 45 | अभिजित | | 2,000 |
| 46 | व्येकटेश | | 5,000 |
| | | | **478,512** |

**नम्र विनंती**

**मातृमंदिर देवरुखचे आपण सन्माननीय सभासद आहात. संस्थेच्या विविध विभागांचे कार्य आपल्यापर्यंत तात्काळ पोचविण्यासाठी व संपर्कासाठी आपले अद्यायावत पत्ते दूरध्वनी व मोबाईल क्रमांक, इ-मेल इ. कृपया देवरुख येथील मुख्य कार्यालयाकडे कळवावेत, ही नम्र विनंती.**

**इ-मेल :**matrumandir५४rediffmail.com ₹mailto:matrumandir५४rediffmail.com>

**वेबसाईट :**₹https://matrumandirdevrukh.org>

**दूरध्वनी : ७७४१०३३१७२**

**मातृमंदिरला दिलेल्या देणग्या आयकर अधिनियम १९६१ च्या**
**कलम ८० ( जी) नुसार आयकर मुक्त आहेत :** AAATM1894QF20096